सावित्रीबाईंच्या विचारांची ज्योत पिढ्यान्‌पिढ्या तेवत राहील - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार
>>पान 2

खेळाडूंच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव पाठीशी राहणार : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार
>>पान 3

भाजपाची जेन झी नवीन समिती : नितीन नबीन यांनी घेतली पहिली बैठक
>>पान 4

सुविचार

बोलण्यापेक्षा करून दाखवा, परिणाम अधिक बोलका असतो

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 33 ■ रविवार, दि. 23 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



अर्जुन बिजलानी कार अपघातातून बचावला, टीमनं केली पुष्टी...

आतील पान

## भुलेश्वरच्या ‘राजा’ची मूर्ती कोसळली; दोघांचा मृत्यू, पाच जण जखमी

**मुंबई। प्रतिनिधी :** ‘भुलेश्वरचा राजा’च्या आगमन सोहळ्यादरम्यान शनिवारी रात्री गणेशमूर्ती कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून पाच जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. भुलेश्वर येथील बलराम मर्चंट रोड, कबुतरखाना, जय अंबे चौक परिसरात रात्री १० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. आगमन सोहळ्यात मूर्ती कोसळल्याची माहिती मुंबई अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाला मिळाली.घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल, पोलिस, वाहतूक पोलिस, १०८ रुग्णवाहिका तसेच पालिकेचे संबंधित विभागीय कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. सुरुवातीला कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नव्हती. मात्र, नंतर जी. टी. रुग्णालयातील संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एक व्यक्ती मृतावस्थेत रुग्णालयात आणण्यात आली, तर दोन जण जखमी अवस्थेत उपचारासाठी दाखल झाले. रिलायन्स रुग्णालयात दाखल एका जखमीचा मृत्यू झाला. सैफी रुग्णालयात १ आणि जेजे रुग्णालयात २ जखमींवर उपचार सुरू आहेत. मृत व्यक्ती आणि जखमींची ओळख तसेच दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनास्थळी पोलिस आणि पालिका प्रशासनाकडून बचाव कार्य सुरू आहे.

# दाऊदनंतर आता भारतासाठी शहजाद भट्टीची डोकेदुखी

## ड्रग्जच्या आहारी गेलेल्या तरुणांना हेरून त्यांचा कारवायांसाठी वापर

**इस्लामाबाद। वृत्तसंस्था :** पाकिस्तानात बसून भारताविरोधात कारवाया करणाऱ्या दाऊद इब्राहिमनंतर आता शहजाद भट्टी हा दहशतवादी भारतासाठी मोठी डोकेदुखी ठरला आहे. ड्रग्जच्या आहारी गेलेल्या तरुणांचा भारताविरोधातील कारवायांसाठी वापर करण्यासोबतच लहान-मोठे हल्ले घडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा खुबीने वापर करण्यासह प्रत्यक्ष हल्ले घडविण्यापर्यंत सहा टप्प्यावर त्याचे नेटवर्क काम करत असल्याचे उघड झाले आहे.

१६ मार्च २०२५च्या पहाटे पंजाबच्या जालंधरमध्ये सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर व यूट्यूबर नवदीप सिंह संधू यांच्या घरावार हल्ला झाला. बाल्कनीत ग्रेनेड फेकला गेला. पंजाब पोलिस व एनआयएने या प्रकरणात हार्दिक कंबोज नावाच्या स्थानिक तरुणाला अटक केली.



या हल्ल्याची जबाबदारी पाकमध्ये दडलेला गँगस्टर ते दहशतवादी बनलेल्या शहजादने स्वीकारली आणि हे प्रकरण हाय प्रोफाईल झाले. पाकिस्तानात बसून शहजादने भारतात अनेक कट रचले आहेत. पाकमध्ये बसून शहजाद व त्याचे गुंड यांचे नेटवर्क आजही काम करत असल्याचे काही रिपोर्ट आहेत.

### भट्टीचे नेटवर्क कसे काम करते?

- ड्रग्जच्या आहारी गेलेले, कमी शिकलेले, गरीब व पैशांची अत्यंत गरज असलेले भारतीय तरुण हेरणे.
- त्यांना रेकी करणे किंवा सिमकार्ड अरेंज करण्यासारखी कामे देऊन ड्रग्जच्या आहारी गेलेल्या व्यक्तीला
- २ ते ५ हजार रुपये देऊन त्याच्या नावे सिमकार्ड घ्यायला लावणे.
- सीसीटीव्ही कॅमेरे विकत घेऊन ते सांगितलेल्या ठिकाणी लावणे.
- सीसीटीव्हीला सिमकार्ड कनेक्ट करून पाकिस्तानी हँडलरला त्याचा क्सेस देणे.
- प्रत्यक्षात हल्ले घडविण्यासाठी तरुणांना तयार करणे.

**शनी टायगर**
पाकिस्तानी गँगस्टर, शस्त्र पुरवठादार, ब्रेन वॉश करण्यात पटाईत

**जफर सुपारी**
बलुचिस्तानील गँगस्टर, सोशल मीडिया माध्यमातून भारतीय तरुणांच्या भरतीची जबाबदारी

**फारुख खोखर**
बलुचिस्तानी कुख्यात गँगस्टर, शस्त्रांचा मोठा पुरवठादार

# राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर

## ■ देशभरातील ४८ शिक्षकांची निवड ■ महाराष्ट्रातील चार शिक्षकांचा समावेश

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देत शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या देशभरातील ४८ शिक्षकांची राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील चार शिक्षकांचा समावेश आहे. शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे.







केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत हा पुरस्कार दिला जातो. नावीन्यपूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्त्व विकास, शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेले प्रयत्न तसेच सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**महाराष्ट्रातील चार मानकरी**

**डॉ. कविता नृसिंहराव गिट्टे (बीड) :**
केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात कार्यरत असलेल्या डॉ. कविता गिट्टे यांनी दिव्यांग तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलांसह वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अध्यापन करताना त्यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गळती रोखण्यासाठीही प्रभावी प्रयत्न केले.

**कुंदा जयवंत बच्छाव (नाशिक) :**
नाशिक महानगरपालिका शाळा क्र. १८चा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी कुंदा बच्छाव यांनी विविध अभिनव उपक्रम राबविले. ‘मिशन मोबाईल-फ्री’ अंतर्गत ‘ज्ञानभिंती’, ‘आनंदवली शिक्षण कट्टा’ तसेच अमेरिकेतील शाळांशी ‘ई-ट्विनिंग’द्वारे संवाद अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना डिजिटल आणि आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा अनुभव मिळवून दिला.

**वैभव वसंतराव कुलकर्णी (लातूर)**
पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, लातूर येथे कार्यरत असलेल्या वैभव कुलकर्णी यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, विज्ञान-तंत्रज्ञान आणि कौशल्याधारित शिक्षणावर विशेष भर दिला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी विविध शालेय व राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**शिवप्रसाद अरविंद टिंगरे (सातारा)**
सैनिक स्कूल, सातारा येथे कार्यरत असलेल्या शिवप्रसाद टिंगरे यांनी विद्यार्थ्यांमध्ये >>पान २

## २६/११ हल्ला: हाफिजसह सहा दहशतवाद्यांवर खटला; पोलिसांनी मागितली गृहमंत्रालयाला मदत

**मुंबई। प्रतिनिधी :** मुंबईवरील २६/११ दहशतवादी हल्ल्याप्रकरणी फरार असलेला लष्कर-ए-तय्यबाचा संस्थापक हाफिज सईद आणि झकी-उर-रहमान लखवी यांच्यासह सहा आरोपींना न्यायालयीन आदेश बजावण्यासाठी मुंबई पोलिसांनी केंद्रीय गृह मंत्रालयाची मदत मागितली आहे. पाकिस्तानात असलेल्या या आरोपींना इंटरपोलमार्फत न्यायालयाचे जाहीर आदेश बजावण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे या आरोपींवर त्यांच्या अनुपस्थितीत खटला चालविण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

२६/११ प्रकरणातील विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी शुक्रवारी विशेष न्यायालयात जुलैमध्ये जारी करण्यात आलेल्या जाहीर आदेशाबाबत अंतरिम अहवाल सादर केला.

पूर्ण फौजदारी खटला

३ ऑगस्ट रोजी गृह मंत्रालयाने पोलिसांची विनंती स्वीकारली असून, त्याबाबतची सद्यस्थिती कळविण्यासाठी वेळ मागितला आहे, अशी माहिती निकम यांनी दिली. खटला टाळण्यासाठी फरार झालेल्या आणि ज्यांना तातडीने अटक होण्याची शक्यता नाही, अशा घोषित फरार आरोपींविरोधात त्यांच्या अनुपस्थितीत पूर्ण फौजदारी खटला चालविण्याची तरतूद आहे.

# शब्दसुरांच्या मैफलीने मेहकर मंत्रमुग्ध

## गझलकार भीमराव पांचाळेंच्या गझलांना रसिकांची दाद

## आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त ‘शब्दसुरांची मेजवानी’; डॉ. भाग्यश्री पांचाळेंनीही सादर केल्या बहारदार गझला



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर :** विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांच्या सप्ताहाची सांगता २० ऑगस्ट रोजी ‘शब्दसुरांची मेजवानी’ या बहारदार गझल मैफलीने झाली. प्रसिद्ध गझलकार भीमराव पांचाळे आणि डॉ. भाग्यश्री पांचाळे यांच्या सुरेल गझलांनी मेहकरातील रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. गझलेच्या प्रत्येक शेरानंतर रसिकांकडून मिळणारी ‘वा...वा...’ची दाद आणि टाळ्यांचा कडकडाट यामुळे संपूर्ण वातावरण भारावून गेले होते.

प्रसिद्ध गझलकार भीमराव पांचाळे यांनी आपल्या खास शैलीत एकापेक्षा एक सरस गझला सादर करत रसिकांची मने जिंकली. त्यांच्या गझलांना उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी रसिकांनी केलेल्या विविध फर्माइशीही पांचाळे यांनी पूर्ण केल्या. त्याचबरोबर त्यांची कन्या डॉ. भाग्यश्री पांचाळे यांनीही आपल्या सुमधुर आवाजात गझला सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.



गझलकार भीमराव पांचाळे यांनी ‘वाचले मी ऐकले मी माणसे’, ‘अचानक माणसांची माकडे कशी झाली’, ‘छाती खुली तरी पाठीत वार केला’, ‘दिलदार यार माझा लाजरा असावा’, ‘तू चोर पावलाने येऊ नकोस आता’, ‘मी किनारे सरकताना पाहिले’ आदी गझला सादर केल्या. तर डॉ. भाग्यश्री पांचाळे यांनी ‘मोगऱ्याची साथ आहे, चांदण्याची रात आहे’, अश्रूंचे जरी हासे झाले’, ‘पाहिले मी दुःख तुझे, दुःख माझे हलके झाले’ आदी गझलांनी रसिकांना स्वरांची मेजवानी दिली. कार्यक्रमादरम्यान आमदार सिद्धार्थ खरात यांनी मनोगत व्यक्त केले. मेहकर शहरातील उद्योजक अजय उमाळकर यांच्या निधनाबद्दल यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते गझलकार भीमराव पांचाळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मातोश्रींनी रचनाबद्ध केलेला ‘ओवीचा रेशमाई’ संग्रह भीमराव पांचाळे यांना भेट देण्यात आला.

यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी भीमराव पांचाळे यांना लोणार फेस्टिव्हलचे आमंत्रणही दिले. तसेच त्यांनी ‘जखमा कशा सुगंधी केल्या...’ ही गझल सादर करून



उपस्थितांची वाहवा मिळवली. साहित्य, संस्कृती आणि इतिहासाची आपल्याला आवड असून भविष्यात आणखी दर्जेदार कार्यक्रम आयोजित केले जातील, असे सांगत ‘गझल हा भविष्यातील राजमार्ग असेल’, असा विश्वास आमदार खरात यांनी व्यक्त केला. भविष्यात मेहकर ही साहित्यिक व सांस्कृतिक राजधानी बनेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर बळी यांनी केले. त्यानंतर भीमराव पांचाळे यांनी ‘अंदाज आरशाचा खरा असावा’ आदी गझला सादर करत रसिकांची वाहवा मिळवली. ‘गरिबाच्या लग्नाला नवरी गोरी काय अन् काळी काय’ या गझलेने शब्दसुरांची मेजवानी’ कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी आमदार सिद्धार्थ खरात, मेहकर नगर परिषदेचे नगराध्यक्ष किशोर गारोळे, निंबाजी पांडव, तालुकाप्रमुख अँड. आकाश घोडे, युवासेना तालुकाप्रमुख, नगरसेवक महेश रिंढे,दत्ता घनवट, सौ. तारामती जायभाय, अँड,संदीप गवई, प्रदीप बिलोरे, शैलेश बावस्कर, गोपाल गायकवाड, सुमित धोटे यांच्यासह अनेक मान्यवर आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाकिस्तान तोंडघशी पडला

अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांचा जम्मू-काश्मीर दौरा अनेकार्थांनी महत्त्वाचा ठरला. या दौऱ्याने जागतिक राजकारणात नव्या चर्चेला जन्म दिला आहे. भारत-अमेरिका संबंधांत होऊ घातलेल्या बदलांचे संकेतही त्यातून मिळत आहेत, असे मानण्यास वाव आहे. गोर यांनी जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेत केलेल्या तीन वक्तव्यांनी या दौऱ्याला वेगळे महत्त्व आले. 'जम्मू-काश्मीर हा भारताचा भाग' आहे, 'हा भाग विलक्षण सुंदर आहे' आणि 'अमेरिका या भागासंदर्भातील आपली प्रवास मार्गदर्शिका पुन्हा तपासून पाहणार आहे,' या विधानांनी इस्लामाबादपासून वॉशिंग्टनपर्यंत खळबळ उडवली. गोर हे अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या अत्यंत जवळच्या वर्तुळातील मानले जात असल्याने त्यांच्या विधानांनी अनेक दशकांपासून पाकिस्तानने काश्मीरला एक वादग्रस्त भूभाग म्हणून जगासमोर मांडण्याचा जो प्रयत्न केला होता, त्या नरेटिव्हला पूर्णविराम मिळाला. कलम ३७० रद्द झाल्यानंतर आणि एप्रिल २०२५ मधील पहलगाम हल्ल्यानंतर एखाद्या विद्यमान अमेरिकन राजदूताने प्रत्यक्ष काश्मीरच्या भूमीवर उभे राहून, असे वक्तव्य करण्याची ही पहिलीच वेळ. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी, आपणच दोन्ही राष्ट्रांमध्ये संघर्षविराम घडवून आणला; अन्यथा अणुयुद्धाचा भडका उडाला असता, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार केला होता. भारताने मात्र हा दावा प्रत्येकवेळी फेटाळत दोन्ही देशांच्या लष्करी अधिकाऱ्यांमधील थेट संवादातूनच शस्त्रसंधी झाल्याचे सातत्याने सांगितले. या पार्श्र्वभूमीवर, गोर यांनी मांडलेली भूमिका भारताच्या काश्मीरविषयक पारंपरिक भूमिकेला दुजोरा देणारी दिसली. ओमर अब्दुल्ला यांच्या शेजारी उभे राहून त्यांनी काश्मीरचे वर्णन भारताचा भाग असे केले. दल सरोवरातील शिकारा सफर आणि तेथील सुरक्षा व्यवस्थेबद्दल त्यांनी व्यक्त केलेले समाधान काश्मीरच्या पर्यटनाच्या दृष्टीने उपकारक आहे. नव्वदीच्या दशकात अमेरिकेची काश्मीरबाबत भूमिका मध्यस्थाची किंवा काश्मीरला एक वादग्रस्त मुद्दा मानण्याची होती. अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर काश्मीरबद्दल संशयाचे वातावरण निर्माण केले जात असे. मात्र, २०१९ नंतर काश्मीरमध्ये जो बदल झाला, तो आता जगालाही मान्य करावा लागत आहे. गोर यांनी काश्मीरमध्ये फिरताना तेथील सुरक्षा व्यवस्था, वातावरण आणि लोकांशी झालेला संवाद यांचे समग्र आकलन करून परिस्थिती सुधारल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. अमेरिकेची काश्मीरसाठी असलेली 'ट्रॅव्हल ॲडव्हायझरी', सध्या लेव्हल ४ म्हणजेच 'डू नॉट ट्रॅव्हल' या श्रेणीत आहे. तीत आता बदल होण्याचे संकेत आहेत. याचा सकारात्मक परिणाम काश्मीरच्या पर्यटनावर आणि गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर होणार आहे. २०१९ ते २०२६ या ७ वर्षांत केंद्र सरकार आणि लष्कराने समन्वयाने काश्मीरमधील दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना केल्या. काश्मीरच्या सुरक्षा चौकटीची कमांड थेट दिल्लीकडे आल्यानंतर तिथे पारदर्शकता आणि परिणामकारकता वाढली आहे. सुरक्षा दलांवरील हल्ल्यांमध्ये झालेली घट, दगडफेकीच्या घटनांचे उच्चाटन आणि दहशतवादाच्या घटनांमध्ये झालेली मोठी घसरण हे याचे पुरावे आहेत. काश्मीरमध्ये विकासाचे, शांततेचे नवे पर्व सुरू झाले आहे. 'सरकार तुमच्या दारी' संकल्पना राबवून प्रशासनाने लोकांचा विश्र्वास संपादन केला आहे. येथील तरुण दगडफेकीऐवजी शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराकडे वळत आहेत. २०२३ मध्ये जी-२० देशांच्या प्रतिनिधींची बैठक काश्मीरमध्ये आयोजित करून भारताने 'बदलत्या काश्मीर'ची झलक जगाला दाखवली होती. २०२३ ते २०२५ या कालावधीत जम्मू-काश्मीरमध्ये एकूण सुमारे ७ कोटी ८५ लाख पर्यटकांनी भेट दिली. २०१६ ते २०१८ मधील ४ कोटी ७६ लाख पर्यटकांच्या तुलनेत हा आकडा खूप मोठा आहे. पहलगाम हल्ल्यानंतर अधिक कडक झालेली अमेरिकेची मार्गदर्शिका सैल झाली, तर त्याचा थेट परिणाम काश्मीरच्या पर्यटनावर होऊ शकतो. परदेशी पर्यटकांचा ओघ पुन्हा वाढवण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि पर्यटन व्यावसायिक अनेक वर्षे प्रयत्नशील आहेत; अशावेळी जागतिक महासत्तेची मोहर काश्मीरमधील शांततेवर उमटणे, महत्त्वाचे ठरते. शांततेचा हा प्रवास आता न थांबता अधिक वेगाने पुढे जात आहे, हेच गोर यांच्या दौऱ्यातून आणि प्रतिक्रियेतून सिद्ध झाले आहे. अपेक्षेप्रमाणे पाकिस्तानने यावर तीव्र प्रतिक्रिया देत जम्मू-काश्मीरचा अंतिम निर्णय संयुक्त राष्ट्रांच्या ठरावांनुसार आणि काश्मिरी जनतेच्या इच्छेनुसार व्हावा, असा पुनरुच्चार केला. गोर यांचे विधान बेजबाबदारपणे केल्याचे पाकिस्तानने म्हटले. यात नवीन काहीच नाही; मात्र या निषेधामागील अगतिकता लक्षवेधी आहे. 'इस्लामिक नाटो' आकाराला आल्यानंतर पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना भारतविरोधात नवे धुमारे फुटले आहेत. पाकच्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी भारताला 'जशास तसे प्रत्युत्तर' देण्याची धमकी दिली. अशा स्थितीत अमेरिकन राजदूतांची विधाने 'गुगली' ठरली असून, पाकिस्तान नेहमीप्रमाणे तोंडघशी पडला.

# सावित्रीबाईंच्या विचारांची ज्योत पिढ्यान्‌पिढ्या तेवत राहील - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** सावित्रीबाई फ ुले यांच्या जीवनकार्याची आणि परिवर्तनवादी विचारांची साक्ष देणाऱ्या २८ ज्ञानशिल्पांचे लोकार्पण करण्याचे भाग्य लाभणे हा माझ्यासाठी मनस्वी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. या ज्ञानशिल्पांतून शिक्षण, मानवता, समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित ज्ञानशिल्प लोकार्पण समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, कुलसचिव प्रा. डॉ. कपिल पवार, विद्यापीठाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे, विविध व्यवस्थापन मंडळांचे सदस्य, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि सामाजिक समतेसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या कार्याचे ऋण आपण कधीही फेडू शकत नाही. त्यांनी केवळ एका पिढीला शिक्षण दिले नाही, तर पुढील अनेक पिढ्यांसाठी परिवर्तनाची वाट निर्माण केली.

सावित्रीबाईंच्या जीवनकार्याचे विविध पैलू या ज्ञानशिल्पांतून मांडण्यात आले आहेत. पुण्यातील भिडेवाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू करणे, पहिल्या महिला शिक्षिका म्हणून कार्य करणे, बालहत्या प्रतिबंधक गृहाची



स्थापना, कवयित्री व साहित्यिक म्हणून योगदान, सत्यशोधक चळवळीत सहभाग आणि प्लेगच्या महामारीत रुग्णांची सेवा करणे, अशा अनेक कार्यांचा यात समावेश आहे. ''या ज्ञानशिल्पांमध्ये आरसा लावून त्याखाली 'मी कोण?' असा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्या आरशात पाहताना मलाही हा प्रश्न पडला. पुढच्या क्षणी जाणवले की मी सावित्रीची लेक आहे. एका छोट्या गावातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या माझ्यासारख्या मुलीला आज महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली, यामागे सावित्रीबाईंच्या कार्याची प्रेरणा आहे. त्याबद्दल मी सदैव ऋणी आहे,'' असे उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या.

महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी काम करताना मोठा विरोध आणि त्रास सहन केला. मात्र, त्यांनी आपल्या ध्येयापासून कधीही माघार घेतली नाही. सावित्रीबाईंनी पेटवलेली शिक्षणाची ज्योत आज देशभर प्रकाश देत असून, त्याच संघर्षाच्या बळावर महिला आज विज्ञान, शिक्षण, प्रशासन, उद्योग, क्रीडा, संरक्षण आणि शेतीसह प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध करत आहेत, असे पवार यांनी नमूद केले.

पुण्यातील ऐतिहासिक भिडेवाड्यात फुले दाम्पत्याचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याच्या कामासाठी अजितदादा पवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. आवश्यक परवानग्या मिळवून हे काम पुढे नेण्यासाठी त्यांनी विशेष पाठपुरावा केला, अशी आठवणही त्यांनी यावेळी सांगितली.

महाराष्ट्राला जिजाऊ माँसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा महान वारसा लाभला आहे. जिजाऊंनी छत्रपती शिवरायांना संस्कार दिले, सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, तर अहिल्यादेवींनी लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श निर्माण केला. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक मुलगी ही जिजाऊ, सावित्री आणि अहिल्येची लेक आहे, असे त्यांनी सांगितले.

महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकारकडून 'लेक लाडकी', 'लाडकी बहीण', 'पिंक रिक्षा', 'लखपती दीदी' यांसारख्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळावा, ही महाराष्ट्राची भावना आहे. त्यांच्या महान कार्याचा योग्य सन्मान व्हावा, यासाठी महाराष्ट्र विधानसभेने केंद्र सरकारकडे एकमताने शिफारस केली असल्याचेही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी सांगितले.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, सावित्रीबाई फ ुले यांच्या जीवनकार्यावर आधारित ज्ञानशिल्पांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनाचा, शैक्षणिक कार्याचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा परिचय नव्या पिढीला होणार आहे. ज्ञानशिल्पांमधून सावित्रीबाईंच्या जीवनातील विविध पैलू साकारण्यात आले आहेत. मुलींच्या शिक्षणासाठी सुरू केलेली पहिली शाळा, प्रौढ शिक्षणाचा आग्रह, सत्यशोधक चळवळीतील सहभाग, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी केलेले कार्य, समाजप्रबोधन, साहित्यिक योगदान, महात्मा फुले यांच्यासोबतचे सहजीवन आणि प्लेगच्या साथीच्या काळात केलेली लोकसेवा अशा अनेक प्रसंगांचे दर्शन या ज्ञानशिल्पांतून घडते. ही ज्ञानशिल्पे केवळ भिंतीवरील चित्रे नसून इतिहास आणि वर्तमानाचा संवाद घडविणारे माध्यम आहेत. विद्यापीठ परिसरात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला या ज्ञानशिल्पांतून सावित्रीबाईंच्या विचारांची ओळख होईल आणि शिक्षणाचा उपयोग समाजाच्या परिवर्तनासाठी करण्याची प्रेरणा मिळेल.

सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित ज्ञानशिल्पांची निर्मिती हा केवळ कलात्मक उपक्रम नसून त्यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. या ज्ञानशिल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सावित्रीबाईंच्या संघर्षाची, सामाजिक बांधिलकीची आणि शिक्षणविषयक विचारांची प्रेरणा मिळेल, असे आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे म्हणाले. सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासाठी आवश्यक असलेल्या विविध परवानग्यांचा प्रश्नही मार्गी लावण्यात आला. या कामात तत्कालीन पालकमंत्री अजितदादा पवार यांनी विशेष पाठपुरावा केला, अशी आठवण पांडे यांनी यावेळी सांगितली.

ज्ञानशिल्पांची उपमुख्यमंत्र्यांकडून पाहणी

लोकार्पणानंतर उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी विद्यापीठ परिसरातील सर्व २८ ज्ञानशिल्पांची पाहणी केली. प्रत्येक शिल्पाची माहिती जाणून घेत त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचे विविध पैलू समजून घेतले. या ज्ञानशिल्पांची संकल्पना, त्यामागील उद्देश आणि निर्मितीत सहभागी झालेल्या सर्वांचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी शिल्पकार नवीन शेगमवार, आर्किटेक्ट धनंजय सालकर तसेच यासाठी समितीच्या माध्यमातून कामगिरी केलेले प्रा. डॉ. संजय चाकणे यांचाही विशेष गौरव करण्यात आला. आभार कुलसचिव प्रफुल्ल पवार यांनी मानले.

## ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासह अत्याधुनिक सुविधा देण्यास कटिबद्ध मंत्री प्रकाश आबिटकर

**नशिक । प्रतिनिधी :** ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना उपचारासाठी दूरवर जावे लागू नये, यासाठी स्थानिक पातळीवरच सक्षम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आरोग्य केंद्रामध्ये आवश्यक त्या सुविधा, मनुष्यबळ व वैद्यकीय साधनसामग्री उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी ग्रामीण रुग्णालय सुरगाणा येथे भेट देत पाहणी केली. यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार नितीन पवार,आरोग्य उपसंचालक डॉ. कपिल आहेर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीश शिंपी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे,निवासी वैद्यकीय अधिकारी संदीप सूर्यवंशी, डॉ. आनंद पवार,सुरगाणा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.संदीप चौधरी, वैद्यकीय अधिकारी डॉ .सचिन वानखेडे यांच्यासह संबंधित अधिकारी, परिचारिका, आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मंत्री श्री. आबिटकर यांनी रुग्णालयातील रुग्णांशी संवाद साधत त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली.

मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, आरोग्य संस्थांमध्ये स्वच्छता, रुग्णसेवा, औषधांची उपलब्धता आणि वैद्यकीय उपकरणांची कार्यक्षमता याबाबत विशेष दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. नागरिकांना शासनाच्या आरोग्य योजनांचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

मंत्री श्री. आबिटकर यांनी सुरगाणा येथील ग्रामीण रुग्णालयांची पाहणी करताना बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, प्रसूती विभाग, प्रयोगशाळा, औषध भांडार, रुग्ण कक्ष आदी सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांना वेळेत व



दर्जेदार आरोग्य सेवा मिळत आहेत का, याबाबत त्यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी रुग्णालयातील विविध विभाग, उपलब्ध वैद्यकीय सुविधा, औषधसाठा, वैद्यकीय उपकरणे तसेच रुग्णांना देण्यात येणाऱ्या उपचार सेवांची माहिती घेतली.

यावेळी ३० खाटांच्या ग्रामीण रुगालय व सुरगाणाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन झाल्याने अतिरिक्त २० खाटांच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन मंत्री श्री. आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले.

# पंतप्रधान मोदींचा भाजपाच्या नवीन राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांशी संवाद

## 'वंदे मातरम्'बाबतच्या काँग्रेसच्या निर्णयाचा पक्षाच्या ठरावातून निषेध

**दैनिक आपला विदर्भ**

नवी दिल्ली - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सांगितलं की, अशा चर्चांचा उद्देश पक्षाला बळकट करण्यासाठी नवीन कल्पना आणि दृष्टिकोन मांडणे हा असतो. भाजपाचे अध्यक्ष नितीन नबीन यांच्या नेतृत्वाखालील नवीन टीमची घोषणा १७ ऑगस्ट रोजी करण्यात आली होती आणि या टीमच्या सर्व सदस्यांची पक्षप्रमुख व पंतप्रधानांसोबत झालेली ही पहिलीच बैठक होती. या बैठकीला मावळत्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे काही पदाधिकारी आणि पक्षाच्या काही राज्य शाखांचे प्रमुखही उपस्थित होते.

संघटनात्मक बैठकांचा उद्देश पक्षाला बळकट करणे आणि लोकांशी असलेला संपर्क अधिक दृढ करणे यासाठी नवीन कल्पना आणि दृष्टिकोन मांडणे हा असतो. पक्षातील सहकारी आणि नवीन संघटनात्मक टीमसोबत झालेला संवाद अतिशय उत्तम होता, असं मोदींनी एक्स वरील एका पोस्टमध्ये म्हटलय. बैठकीला उपस्थित असलेल्यांमध्ये भाजपाचे नवीन उपाध्यक्ष राम माधव आणि राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे; सरचिटणीस स्मृती इराणी, त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लब देब, सरचिटणीस (संघटना) बी. एल. संतोष; तसंच खजिनदार केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांचा समावेश होता.

एक्सवरील एका पोस्टमध्ये भाजपाने म्हटलं आहे की, मोदींनी पक्षाच्या नवनियुक्त संघटनात्मक टीमशी संवाद साधला आणि पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसंच लोकांशी संपर्क अधिक दृढ करण्यासाठी आपले विचार व दृष्टिकोन मांडले. नबीन यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय टीममध्ये ६५ पदाधिकाऱ्यांचा समावेश असून, त्यात ५१ नवीन चेहऱ्यांचा समावेश आहे. पक्ष सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या या बैठकीत आगामी विधानसभा




निवडणुकांची तयारी, तळागाळातील पातळीवर पक्षसंघटना सक्रिय करणे आणि सरकारच्या उपक्रमांची जनतेमध्ये माहिती पोहोचवणे या मुद्द्यांवर प्रामुख्याने चर्चा करण्यात आली.

वंदे मातरम्‌चे केवळ दोनच कडवे गाण्याच्या काँग्रेसच्या निर्णयाचा भाजपाने निषेध केला आणि या राष्ट्रगीताच्या पूर्ण रूपाची प्रतिष्ठा व राष्ट्रीय दर्जा जपण्याचा संकल्प केला. येथे झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या १० कलमी ठरावात सत्ताधारी पक्षाने म्हटलं की, ते वंदे मातरम्‌चे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी देशव्यापी मोहीम राबवतील. तसंच, काँग्रेसला याची आठवण करून दिली जाईल की, त्यांच्या कार्यकारिणीचा ठराव भारताच्या घटनात्मक संस्था किंवा कायद्यांपेक्षा वरचढ ठरू शकत नाही. वंदे मातरम या राष्ट्रगीताची सर्व सहा कडवी आणि त्याचा इतिहास विसरला जाऊ नये, तसंच वंदे मातरमशी अविभाज्यपणे जोडलेले त्याग, संघर्ष आणि देशभक्तीची जागृती यांबाबत भावी पिढ्यांना समज मिळावी, यासाठी भाजप लोकांमध्ये, विशेषतः तरुण पिढीमध्ये जनजागृती करेल आणि त्यांना संघटित करेल, असा ठराव पक्षाने केला.

१९३७ मधील राजकीय तडजोडीला १९५० ची घटनात्मक तरतूद आणि २०२६ मध्ये संसदेनं मंजूर केलेला कायदा यांच्यापेक्षा वरचं स्थान दिलं जाऊ शकत नाही, असं भाजपानं म्हटलंय. तसंच, वंदे मातरम हे ''साम्राज्यवादविरोधी घोषवाक्य'' असून ते ''सर्वोच्च राष्ट्रीय भावनेशी'' जोडलेलं आहे, असं महात्मा गांधींनी म्हटलेलं विधान पक्ष सर्वत्र पोहोचवेल, असंही भाजपानं स्पष्ट केलं.

३० जुलै रोजी संसदेनं राष्ट्रीय सन्मान अवमान प्रतिबंध (सुधारणा) कायदा, २०२६ मंजूर केला; या कायद्यान्वये वंदे मातरम्‌ला जन गण मन या राष्ट्रगीताप्रमाणेच कायदेशीर दर्जा देण्यात आला आहे.

सुधारित कायद्यानुसार, वंदे मातरम् गायनात जाणीवपूर्वक व्यत्यय आणणे किंवा ते गाण्यापासून रोखणे हा फौजदारी गुन्हा ठरवण्यात आला असून, त्यासाठी ३ वर्षांपर्यंतचा कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. ''ही एक विलक्षण ऐतिहासिक विसंगती आहे की, वसाहतवादी राजवटीविरुद्ध प्रतिकार जागृत केल्यामुळे ज्या वंदे मातरम्‌ला ब्रिटिशांनी दडपण्याचा प्रयत्न केला होता, त्याच वंदे मातरम्‌ला काही दशकांनंतर काँग्रेसनं सांप्रदायिक तुष्टीकरणाच्या नावाखाली केवळ दोन कडव्यांपुरतं मर्यादित केलं,'' असं भाजपाच्या ठरावात नमूद करण्यात आलं.

काँग्रेसनं एकेकाळी वंदे मातरम् चे राष्ट्रीय महत्त्व मान्य केलं होतं, परंतु नंतरच्या काळात त्यांनी ''वाढत्या सांप्रदायिक दबावा''पुढे माघार घेतली, असंही त्यात म्हटलं आहे.

पान १ वरून...

## राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर

शिस्त, नेतृत्वगुण आणि देशसेवेची भावना रुजविण्यासाठी विशेष योगदान दिले. एनडीए तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून भावी लष्करी अधिकारी घडविण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

**तीन टप्प्यांत निवड प्रक्रिया**

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी यंदा जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन टप्प्यांत निवड प्रक्रिया राबविण्यात आली. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय पोर्टलवर १५ जून ते २० जुलै २०२६ या कालावधीत पात्र शिक्षकांकडून ऑनलाइन स्व-नामांकन मागविण्यात आले होते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, नावीन्यपूर्ण अध्यापन, व्यक्तिमत्त्व विकास, शाळेच्या गुणवत्तावाढीसाठीचे प्रयत्न आणि वंचित घटकांसाठी केलेले कार्य या निकषांवर मूल्यमापन करून अंतिम ४८ शिक्षकांची निवड करण्यात आली.

**विज्ञान भवनात राष्ट्रीय गौरव**

शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी विज्ञान भवनात होणाऱ्या विशेष समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जातील. पुरस्कारप्राप्त शिक्षकांच्या प्रेरणादायी कार्याची माहिती देणारे लघुपटही यावेळी प्रदर्शित करण्यात येणार आहेत. या सोहळ्याचे दूरदर्शन, शिक्षण मंत्रालयाची 'स्वयं प्रभा'वाहिनी तसेच अधिकृत वेबकास्ट आणि सोशल मीडिया माध्यमांवर थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले.
मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### बंदुकांची अवैध तस्करी करणाऱ्या बिहारमधील तिघांना अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपुर । प्रतिनिधी** : चंद्रपुरात बंदुकांची अवैध तस्करी करणाऱ्या बिहारमधील तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून दोन बंदुका, दोन मॅगझीन आणि १३ जिवंत काडतूस असा सुमारे ६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे दुर्गेश मिश्रा, रवी पासवान, आणि सुनील सहानी, अशी असून, तिघेही बिहारमधील दरभंगा येथील रहिवासी आहेत. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बंदुका नेमक्या कोणाच्या मागणीवरून चंद्रपुरात आणण्यात आल्या होत्या, याचा तपास सुरू असल्याची माहिती चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी दिली. पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे करीत आहेत.

### 'छात्रों की गुंज': मनुवादी मानसिकता झुगारा! भारतीय नारीशक्तीला राहुल गांधी यांची साद



दैनिक आपला विदर्भ

**पुणे । प्रतिनिधी :** महिलांना केवळ मुलगी, पत्नी आणि आई या तीन चौकटींमध्ये मर्यादित ठेवून आयुष्यभर पुरुषांच्या नियंत्रणात डांबणे ही मनुस्मृतीची प्रतिगामी मानसिकता आहे. ही पुरुषप्रधान व्यवस्था महिलांना पिंजऱ्यात बंदिस्त ठेवू पाहते. मात्र, या देशातील ७० कोटी महिला हीच भारताची खरी ताकद, पाया आणि भविष्य आहेत. महिलांनी कोणापुढेही स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याची गरज नाही; समाजाने लादलेली बंधने झुगारून स्वतःच्या हक्काच्या जागेसाठी आवाज उठवला पाहिजे, अशी साद काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तरुणींना घातली.

पुण्यात आयोजित 'छात्रों की गुंज' या संवाद कार्यक्रमात राहुल गांधी यांनी शेकडो विद्यार्थिनींशी थेट संवाद साधला. या वेळी विद्यार्थिनींनी स्पर्धा परीक्षांमधील गैरव्यवहार, सामाजिक दबाव, रोजच्या प्रवासातील असुरक्षितता व व्यवस्थेतील भेदभावाचा पाढा वाचला.

महिला खेळाडूंच्या आंदोलनाचा संदर्भ देत ते म्हणाले, जंतरमंतरवर आपल्या न्यायासाठी लढणाऱ्या महिला खेळाडूंनी आवाज उठवला किंवा शिव्या दिल्या, तर पंतप्रधानांना 'सांस्कृतिक धक्का' बसतो. पुरुषांनी काहीही केले तरी चालते, पण मुलींनी अन्यायाविरोधात तोंड उघडले की संस्कृती धोक्यात येते का? असा थेट सवाल त्यांनी केला.

राहुल गांधी यांनी स्लाईड्सच्या माध्यमातून देशातील महिलांच्या सद्य:स्थितीचा धक्कादायक अहवाल मांडला. देशात जन्माला येण्यापूर्वीच दरवर्षी सुमारे साडेचार लाख मुलींची गर्भात हत्या होते. रस्त्यावर, कामाच्या ठिकाणी किंवा प्रवासात ८० टक्के महिलांना मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते.

सामाजिक लज्जा आणि भीतीपोटी ९९ टक्के लैंगिक अत्याचाराच्या घटनांची नोंदच होत नाही. समान कामासाठी महिलांना पुरुषांपेक्षा २५ टक्के कमी वेतन मिळते. देशात केवळ ८ टक्के महिलांकडे स्वतंत्र संपत्तीची मालकी आहे, तर ६० टक्के महिला घराबाहेर एकट्या पडू शकत नाहीत, अशी धक्कादायक आकडेवारी राहुल गांधी यांनी यावेळी मांडली.

राहुल गांधी तरुणींना धीर देत म्हणाले, तुम्ही कोणाचीही मालमत्ता नाही. तुम्ही स्वतःच्या मालक आहात. पुरुषप्रधान संस्कृतीने तयार केलेल्या 'नियंत्रण आणि भीती'च्या चक्रव्यूहाला भेदून काढा. स्वतःच्या हक्काच्या जागेसाठी निर्भयपणे लढा.

तरुणाईने विचारलेल्या प्रश्नांना मनमोकळी दाद देत राहुल गांधी यांनी उपस्थितांचे आभार मानले. 'पुणे म्हणजे प्रेम! लव्ह यू ऑल!' असा नारा देत पुणेकरांशी आपले अतूट नाते अधोरेखित केले.

# खेळाडूंच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव पाठीशी राहणार : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

## खो-खो असोसिएशनची बैठक संपन्न; कामकाज होणार पेपरलेस; २३ जिल्ह्यांच्या सचिवांना लॅपटॉप

दैनिक आपला विदर्भ




**पुणे । प्रतिनिधी** : बदलत्या युगात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे कामकाज पेपरलेस करण्याच्या उद्देशाने असोसिएशनच्या जिल्हा संघटकांसह तांत्रिक समितीला लॅपटॉपचे वितरण उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्ष सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. खेळ आणि खेळाडूंच्या सन्मानासाठी तसेच त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव पाठीशी राहू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा क्रीडा मंत्री श्रीमती पवार यांनी दिली.

या कार्यक्रमाला असोसिएशनच्या उपाध्यक्ष अश्विनी पाटील, सरचिटणीस डॉ. चंद्रकांत जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार गोविंद शर्मा, शिवछत्रपती क्रीडा संघटक पुरस्कार प्राप्त जनार्दन शेळके, अर्जून पुरस्कार प्राप्त सुरेखा कुलकर्णी, श्रीरंग इनामदार उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, बदलत्या युगामध्ये नवीन तंत्रज्ञान स्वीकारणे ही काळाची गरज बनली असून लॅपटॉपमुळे पेपरलेस कामकाजाला सुरुवात होईल. स्व. अजित दादांनी खो-खो खेळाच्या चौफेर प्रगतीसाठी अत्यंत तळमळीने प्रयत्न केले. त्यांच्याच संकल्पनेतून पेपरलेस कामकाजासाठी लॅपटॉप वितरण होत असल्याचे सांगितले.

बारामतीत ऑक्टोबरमध्ये कै. भाई नेरुरकर चषक स्पर्धा

कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा ही महाराष्ट्रातील एक महत्त्वाची व प्रतिष्ठित खो-खो स्पर्धा दरवर्षी घेण्यात येते. महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा राज्यभरात वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केली जाते. यावर्षी ऑक्टोबर महिन्यात ही स्पर्धा बारामती येथे होणार असून स्पर्धेच्या अनुषंगाने असोसिएशनने तयारीला सुरुवात करावी,असेही त्या म्हणाल्या.

यावेळी असोसिएशन अंतर्गत अहिल्यानगर, बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, धुळे, हिंगोली, जळगाव, जालना, लातूर, मुंबई, मुंबई उपनगर, नांदेड, नंदुरबार, पालघर, परभणी, पुणे, रत्नागिरी, रायगड, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे येथील सचिवांकडे लॅपटॉप सुपूर्द करण्यात आले.

### खासगी शिकवणी केंद्रांच्या नियमनासाठी कायद्याच्या प्रारूप मसुद्यावर ४ सप्टेंबरपर्यंत सूचना-हरकती पाठविण्याचे आवाहन

**मुंबई :** राज्यातील खासगी शिकवणी केंद्रांच्या नोंदणी व नियमनासाठी स्वतंत्र कायदा करण्याच्या दृष्टीने शासनाने महाराष्ट्र खासगी शिकवणी केंद्र (नोंदणी व विनियमन) अधिनियम, २०२६ या कायद्याचा प्रारूप मसुदा तयार केला आहे. यावर नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत. हा प्रारूप मसुदा शालेय शिक्षण विभागाच्या https://education.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून नागरिकांनी आपल्या सूचना व हरकती शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट रोड, पुणे-४११००१ किंवा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, डॉ. ॲनी बेझंट रोड, पुणे-४११००१ यांच्याकडे सादर कराव्यात, असे आवाहन शासनाने केले आहे.

केंद्र शासनाने १६ जानेवारी २०२४ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांसह देशातील विविध राज्यांमधील संबंधित कायदे व नियमांचा अभ्यास करून हा मसुदा तयार करण्यात आला आहे. यावर प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना व हरकतींची छाननी करून त्यावरील अभिप्रायासह एकत्रित अहवाल २० सप्टेंबर २०२६ पर्यंत शासनास सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर प्राप्त अभिप्रायांचा विचार करून प्रारूप मसुद्यात आवश्यक ते बदल करून कायदा अंतिम करण्याची पुढील प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे उपसचिव समीर सावंत यांनी स्पष्ट केले आहे.

## वरळीतील नागरी समस्या तात्काळ सोडवाव्यात: उपसभापती सचिन अहिर, महापालिका आयुक्तांसोबत बैठक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** वरळी परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर विकासकामे होत आहेत. मात्र, स्थानिक नागरिकांच्या मूलभूत नागरी समस्या आणि अडचणी तात्काळ मार्गी लावाव्यात, असे निर्देश उपसभापती सचिन अहिर यांनी दिले. विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांच्या दालनात यासंदर्भात बैठक झाली. यावेळी बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे उपस्थित होत्या.

बैठकीत वरळीतील विविध प्रलंबित समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. महापालिका आयुक्तांनी हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. बैठकीत आरोग्य व्यवस्था, वाहतूक कोंडी, घनकचरा व्यवस्थापन, पार्किंग आणि उड्डाणपुलांची जोडणी यांसारख्या नागरी समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. वरळी धोबीघाट येथे प्रसूतीगृह आणि लहान मुलांचे विशेष रुग्णालय उभारावे. माता रमाई आंबेडकर हिंदू स्मशानभूमी येथील सुविधांचे बळकटीकरण आचार्य अत्रे



चौक मेट्रो स्थानकासमोरील फूटपाथची कामे, कोस्टल रोड परिसरात उद्यानांची कामे तसेच देखभाल आणि सुशोभीकरण करण्याचे निर्देश उपसभापती सचिन अहिर यांनी दिले.

नेहरू सायन्स सेंटर मेट्रो स्थानकाजवळील डेब्रिज (कामाचा कचरा) हटवून जागा मोकळी करण्याचे तसेच मेट्रोची कामे पूर्ण झाल्याने एमएमआरडीएने पालिकेला जागा हस्तांतरित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. सात रस्ता येथील मोनोरेल ब्रिज मेट्रो स्टेशनला जोडणीचे काम तातडीने पूर्ण करावे. पालिकेच्या वाहनतळांवर पे अँड पार्क स्थानिकांसाठी सवलतीच्या दरात मासिक पास उपलब्ध करून द्यावेत. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी डम्पिंग ग्राऊंडचा नवीन सुधारित आराखडा तयार करावा, आदी सूचनाही उपसभापती सचिन अहिर यांनी केल्या.

वरळीतील परिसराचा विकास साधताना स्थानिक नागरिकांचे हित आणि पुनर्वसन सुरक्षित ठेवण्याचा निर्धार याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. बैठकीस महापालिकेचे संबंधित विभागाचे उपायुक्त आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारकाबाबत चर्चा


मुंबईत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील मंत्री, आमदार यांच्या सहकार्याने उपसभापती सचिन अहिर यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात समन्वय समितीची पहिली बैठक झाली. या स्मारकासाठीच्या जागेबाबतही त्यांनी पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्याशी चर्चा केली.

## राम मंदिराच्या दानपेटीतील कथित चोरीवरून संजय राऊतांचा भाजपवर हल्लाबोल; 'हिंदुत्व ढोंगी'



दैनिक आपला विदर्भ

**बारामती । प्रतिनिधी :** अयोध्येतील श्रीराम मंदिरातील दानपेटी आणि अलंकारांच्या कथित चोरीच्या मुद्द्यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. ''राम मंदिराची दानपेटी लुटणारे आम्हाला हिंदुत्व शिकवतात, हे भाजपचे हिंदुत्व ढोंगी आहे,'' अशी घणाघाती टीका राऊत यांनी केली.



बारामती तालुक्यातील मोरगाव येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने रामरक्षा वाचन सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना संजय राऊत यांनी अयोध्येतील राम मंदिराच्या व्यवस्थापनावरून भाजपला लक्ष्य केले.

''राम मंदिरासाठी कारसेवकांनी बलिदान दिले. मात्र मंदिराचा ताबा मिळाल्यानंतर तेथे भाविकांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या पैशांवर आणि वस्तूंवर डल्ला मारला जात असल्याचे आरोप होत आहेत,'' असे सांगत राऊत यांनी भाजपच्या हिंदुत्वाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात रामरक्षा आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असून, त्याचाच भाग म्हणून बारामतीत रामरक्षा वाचन सभा घेण्यात आल्याचे राऊत यांनी सांगितले. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची शिवसेनाच प्रभू श्रीरामाच्या रक्षणासाठी खरी भूमिका बजावत असल्याचा दावा करत त्यांनी शिंदे गटावरही टीका केली.

# आश्रमशाळा व निवासी संस्थांमधील बालकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी देखरेखीवर भर

## राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडून बालसुरक्षेचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील आश्रमशाळा, निवासी शाळा व वसतिगृहांमध्ये बालकांना सुरक्षित, निरोगी व बालस्नेही वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजनांचा आढावा महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने आयोगाच्या कार्यालयात नुकत्याच आयोजित बैठकीत घेण्यात आला. बालकांच्या सुरक्षिततेसह आरोग्य, शिक्षण, निवास, स्वच्छता, अन्न-पाणी, बालहक्कांचे संरक्षण आणि संबंधित यंत्रणांमधील समन्वय याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय पुराणिक, सदस्य गीतांजली बुटी, शुभांगी तांबट, संजय लाखेपाटील, अतुल देसाई, प्रविण भुजाडे, मिलन जंगम तसेच आयोगाच्या सचिव वंदना जैन यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

निवासी संस्थांमध्ये बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अधिकारी, अधीक्षक, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी २४ तास संवेदनशील व जबाबदारीने कार्य करणे आवश्यक असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. वरिष्ठ स्तरावरून देण्यात येणाऱ्या सूचनांची तळागाळातील यंत्रणेकडून प्रभावी अंमलबजावणी होत आहे किंवा नाही, याचे नियमित परीक्षण करण्याची आवश्यकता यावेळी अधोरेखित करण्यात आली.

आश्रमशाळा व निवासी संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांचा बालकांना प्रत्यक्ष मिळत असलेल्या लाभाबाबत तपासणी करण्यासाठी चाईल्ड सेफ्टी ऑडिट व प्रभावी देखरेख पद्धत विकसित करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. यामध्ये पिण्याचे पाणी, अन्नाची गुणवत्ता, आरोग्य, स्वच्छता, सीसीटीव्ही व्यवस्था, कर्मचाऱ्यांची पडताळणी, तक्रार निवारण व्यवस्था आणि विद्यार्थ्यांचा अभिप्राय या बाबींचा समावेश करण्याची सूचना करण्यात आली.

बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने निवासी संस्थांमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेचे नियमित निरीक्षण, रेकॉर्डिंग व आवश्यकतेनुसार फुटेज सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करण्यावर भर देण्यात आला. तसेच




बालकांच्या थेट संपर्कात येणाऱ्या कायमस्वरूपी, कंत्राटी व इतर कर्मचाऱ्यांचे पोलिस पडताळणी पूर्ण असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

यावेळी निवासी संस्थांमध्ये दूषित पाणी अथवा अन्नामुळे बालकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ नये, यासाठी पाणी तपासणी, पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता, भोजनाची गुणवत्ता, स्वयंपाकघरातील स्वच्छता, अन्न हाताळणी, नियमित आरोग्य तपासणी तसेच आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद याबाबत नियमित देखरेख करण्याच्या आवश्यकतेवर चर्चा झाली.

किशोरवयीन मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने मासिक पाळी व्यवस्थापन, स्वच्छता, सॅनिटरी नॅपकिनची उपलब्धता, योग्य विल्हेवाट व्यवस्था, आरोग्य तपासणी व आवश्यक वैद्यकीय मदत या बाबींकडे विशेष लक्ष देण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

पारधी, कातकरी तसेच इतर वंचित व स्थलांतरित समाजातील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न, जन्मदाखला, आधार व इतर आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे शिक्षण तसेच शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याचे यावेळी सूचित करण्यात आले.

आश्रमशाळा व निवासी संस्थांमध्ये शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यशोगाथा समाजासमोर आणण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

बालकांच्या सुरक्षिततेशी संबंधित विविध बाबींची प्रत्यक्ष पाहणी करून आश्रमशाळा व निवासी संस्थांमधील संपूर्ण सुविधांचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने राज्यस्तरीय तपासणी समिती गठित करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. ही समिती संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक त्या ठिकाणी पाहणी व तपासणी करून अहवाल आयोगास सादर करणार आहे.

# भाजपाची जेन झी नवीन समिती : नितीन नबीन यांनी घेतली पहिली बैठक

दैनिक आपला विदर्भ

नवी दिल्ली : देशभरातील तरुणांशी संपर्क वाढवण्याच्या उद्देशानं, भारतीय जनता पक्षानं आपला आगामी जेन झी संपर्क वाढवण्यासाठी समितीची स्थापना केली. या समितीत भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, राष्ट्रीय सरचिटणीस स्मृती इराणी आणि विनोद तावडे, गुजरातचे मंत्री हर्ष संघवी आणि इतर अनेक नेत्यांचा समावेश आहे, अशी माहिती सूत्रांनी शनिवारी ईटीव्ही भारतला दिली. ही समिती सप्टेंबरपासून जन झीशी संवाद साधण्यास सुरुवात करेल. तरुणांपर्यंत पोहोचण्याच्या पक्षाच्या अजेंड्याचा हा एक महत्त्वाचा भाग असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



हा कार्यक्रम जेन झीच्या आकांक्षा, चिंता आणि अपेक्षा समजून घेण्यावर भर देईल. तरुणांना भाजपा नेत्यांशी थेट संवाद साधण्याची आणि त्यांना भेडसावणाऱ्या मुद्द्यांवर आपली मतं मांडण्याची संधी देईल,'' असं सूत्रांनी सांगितलं. जन झीची व्याख्या साधारणपणे १९९७ ते २०१२ या काळात जन्मलेले तरुण अशी केली जाते. स्मार्टफोन, हाय-स्पीड इंटरनेट आणि सोशल मीडियाचा सतत वापर करत वाढलेली ही पहिलीच पिढी आहे. जुलैमध्ये परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या विरोधात झालेल्या आंदोलनानंतर भाजपानं जेन शीसोबत संपर्क वाढवण्यावर मोठा भर दिला आहे. या आंदोलनामुळे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. कॉकरोच जनता पार्टी () या उपहासात्मक राजकीय चळवळीनं हे आंदोलन पुकारलं. अभिजीत दिपके यांनी मे २०२६ मध्ये सोशल माध्यमांवरुन सुरू केलेल्या या चळवळीनं मीम्स, रिल्स आणि विनोदाचा वापर करून सरकारला प्रश्न विचारले. कॉकरोच जनता पार्टीनं २४ दशलक्ष ऑनलाइन फॉलोअर्स मिळवले.

या आंदोलनांमुळे भाजपाला तरुणांशी संपर्क साधण्याच्या धोरणात आक्रमक बदल करण्याची गरज भासली. जन झीशी संवाद साधण्यासाठी वरिष्ठ नेत्यांची समिती स्थापन करण्याचा अलीकडील निर्णय याच प्रयत्नांचा एक भाग आहे. निवडणुकीची रणनीती आणि तळागाळातील संपर्क यावर चर्चा करण्यासाठी नबीन यांनी शनिवारी पक्षाच्या नव्यानं नियुक्त केलेल्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांसोबत पहिली बैठक घेतली, तेव्हा हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत आगामी विधानसभा निवडणुकांची तयारी, तळागाळातील संघटन आणि सरकारी उपक्रम जनतेपर्यंत पोहोचवणं यावर लक्ष केंद्रित करण्यात आलं, असं सूत्रांनी सांगितलं. दिवसाच्या उत्तरार्धात आणखी बैठका नियोजित आहेत, यामध्ये भाजपाशासित राज्यांचे प्रदेशाध्यक्ष, प्रभारी आणि मुख्यमंत्री उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

भाजपानं या आठवड्याच्या सुरुवातीलाच नितीन नबीन यांच्या नेतृत्वाखाली नवीन राष्ट्रीय टीमची घोषणा केली. यात ६५ पदाधिकाऱ्यांचा समावेश असून ५१ नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. या नवीन टीममध्ये १३ राष्ट्रीय उपाध्यक्षांचा समावेश आहे, यामध्ये राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे सिंधिया आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी पदाधिकारी राम माधव यांचा समावेश आहे. माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांचीही राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बी. एल. संतोष यांना राष्ट्रीय सरचिटणीस (संघटन) म्हणून कायम ठेवण्यात आलं आहे, तर विनोद तावडे आणि सुनील बन्सल यांची सरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नवीन टीममध्ये १२ महिला आणि अल्पसंख्याक समुदायातील सहा नेत्यांचा समावेश आहे.

केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांची राष्ट्रीय खजिनदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मे २०१४ मध्ये नरेंद्र मोदींच्या पहिल्या सरकारमध्ये मंत्री होण्यापूर्वी त्यांनी हे पद भूषवलं होतं. भाजपानं अमित मालवीय यांना आयटी विभागाच्या प्रमुखपदावरून हटवून त्यांच्या जागी छत्तीसगडचे दीपक म्हस्के यांची नियुक्ती केली आहे. तसेच, खासदार तेजस्वी सूर्या यांच्या जागी गुजरातचे हेमंत जोशी यांची पक्षाच्या युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### शिक्षकांबद्दल अपशब्द, दीपकेसह पाचजणांवर गुन्हा; औसा पोलिस ठाण्यात शिक्षिकेने दिली तक्रार

दैनिक आपला विदर्भ

**लातूर । प्रतिनिधी :** जिल्हा परिषद प्रशाळा विभाग (उर्दू), जावळी येथे वर्गात विनापरवाना प्रवेश करत शासकीय कामामध्ये अडथळा आणत शिक्षकांना अपशब्द वापरल्याच्या आरोपावरून औसा पोलिस ठाण्यात शनिवारी कॉकरोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दीपके, अजिंक्य शिंदे यांच्यासह इतर चार ते पाच अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शिक्षिका सय्यद समशादबानो खैरातअली यांनी तक्रार दिली आहे.

पोलिसांनी सांगितले, २० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी 'सीजेपी'चे अध्यक्ष अभिजीत दिपकेसह इतरांनी औसा येथील उर्दू शाळेत विनापरवाना प्रवेश केला. वर्गामध्ये बसून विद्यार्थ्यांना वेगवेगळे प्रश्न विचारत अध्यापनाच्या कामामध्ये व्यत्यय आणला. शाळेचे चित्रीकरण करून ते सोशल मीडियावर व्हायरल केले.

त्याचबरोबर 'शाळेत दुसऱ्याच शाळेचे विद्यार्थी आणून बसवले आहेत' असा खोटा आरोप करत शाळेची बदनामी केली. एवढ्यावरच न थांबता, तेथील शिक्षकांकडे पाहून 'ये हराम का खाते है, इनको शरम नहीं है, तुम्हाला निलंबित करायला लावतो' अशी भाषा वापरत शासकीय कामामध्ये अडथळा आणला, असा आरोप तक्रारीत केला आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे पोलीस पथकातील श्वानांची निवृत्तीनंतरची तगमग थांबणार

## निवृत्तीनंतर आता श्वानाला पोलीस दलातच राहता येणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** श्वान पथक म्हणजे पोलीस दलाचा महत्त्वाचा घटक. गुन्ह्यांचा तपास असो किंवा स्फोटकांचा शोध आणि बचाव मोहिमेत श्वान सगळ्यात पुढे असतो. पण दहा वर्षांनंतर निवृत्त होताच, या श्वानाला पोलीस दल सोडावे लागते. अगदी लहानग्या वयापासून पोलीस दलातील सांभाळ करणाऱ्या रखवालदारापासून अनेकांचा लागलेला लळा सोडवताना या मुक्या शिलेदारांची अवस्था सैरभैर होते. तो क्वचितच निवृत्तीनंतर मिळणाऱ्या पालकांकडे रमतो पण या मुक्या शिलेदारांला आता पोलीस दलातच कायमस्वरूपी राहता येणार आहे. या श्वानाची निवृत्तीनंतरची तगमग आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एका संवेदनशील निर्णयामुळे थांबणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गृह विभागाने पोलीस श्वान पथकातील निवृत्त होणाऱ्या या श्वानांच्या या परिस्थितीतबाबत एक अहवाल सादर केला. असा श्वान केवळ ६ ते ९ आठवड्यांचा असताना पोलीस दलात दाखल होतो. या दरम्यान अनेक आव्हानात्मक आघाड्यांवर हा श्वान पोलीस दलाचा वाटाड्या ठरतो. अगदी स्फोटकांना शोधून काढण्यापासून ते गुन्हेगारांचा माग काढण्यात हा श्वान जीवतोड मेहनत करतो. अनेक जोखमीच्या ठिकाणी तसेच अमली आणि नशिले पदार्थ शोधून काढण्यासाठी श्वानांची मदत घेतली जाते. यामुळे कित्येक शोधमोहिमा यशस्वी करण्यात आणि दुर्घटनास्थळी या श्वानांची कर्तबगारी यशस्वी ठरली आहे. अतिरेक्यांना रोखण्यासाठीची जाँबाज कारवाई ते दुर्घटनेतील ढिगाऱ्यांखाली अडकलेल्या निष्पापांचा जीवांचा ठावठिकाणा शोधण्यात हे मुके शिलेदार प्रामाणिक आणि अथकपणे कर्तव्य बजावत आहे आहेत.

पण या श्वानांसाठी पोलीस दलातील सेवाकाळ १० वर्षाचा निश्चित करण्यात आला आहे. या काळात प्रशिक्षणासह, त्याच्या देखभालीसाठी पोलीस कर्मचारी



नियुक्त केले जातात. या रखवालदार पोलीस कर्मचाऱ्यांशी या श्वानांचे जिव्हाळ्याचे भावबंध जुळतात. श्वानाचा दहा वर्षांचा सेवा काळ संपल्यानंतर त्याला सन्मानपूर्वक सक्षम अशा ठिकाणी दत्तक देण्याची कार्यपद्धती अवलंबली जाते. पण अशा पालकांकडे गेल्यावरही या श्वानाने पोलीस दलातील त्याच्या अधिकारी रखवालदार कर्मचारी यांच्या विरहात अंतिम काळात अन्नत्याग केल्याचे निदर्शनास आले आहे.

या अहवालावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी गृह विभागाला तातडीने निर्देश दिले आहेत. पोलिस दलासाठी अशी दहा वर्षे अथकपणे आणि स्वामिनिष्ठ सेवा दिल्यावर त्याचे असे हाल होणे योग्य नाही. तो श्वान असला तरी त्याची काळजी आपणच घेतली पाहिजे. अशा श्वानाला निवृत्तीनंतरचे जीवन देखील आनंदात आणि त्याचे कर्तबगारीचा घर असलेल्या पोलीस दलातच घालवता येईल अशी व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे आता पोलिस श्वान निवृत्त झाला तरी पोलिसांसोबतच राहणार आहे. त्यामुळे पोलिस विभागातून १० वर्षांची सेवा बजावल्यानंतर हा श्वान निवृत्त होईल. पण, त्याच्या निवृत्तीपश्चात सुद्धा तो पोलिस दलासोबतच राहील अशी तरतूद केली जात आहे. यामुळे त्याच्या रखवालदारासोबत त्याचे असलेले ऋणानुबंध कायम राहतील आणि त्याचे उर्वरित आयुष्य सुखकर होईल. या श्वानाच्या आहारासाठी आणि देखभालीसाठींचा खर्च गृह विभागाला करता येणार आहे


अशा श्वानांनी पोलीस दलासाठी पर्यायाने जनतेच्या हितासाठी दिलेली १० वर्षाची सेवा बजावल्यानंतर त्यांचे उर्वरित आयुष्य केवळ एक ते दिड वर्षच शिल्लक राहते. त्यामुळे अशा श्वानांच्या निवृत्ती पश्चात त्याच्या मृत्यूपर्यंत तसेच या दरम्यान आहार, आरोग्य आणि आवश्यक देखभालीसाठीची आर्थिक तरतूद आता पोलीस दलाकडून करण्यात येणार आहे. निवृत्तीपश्चात श्वान पोलिस दलासोबतच राहिल्याने त्याचे उर्वरित आयुष्य सुखकर होणार आहे. त्याचे रखवालदारासोबतचे ऋणानुबंध कायम राहणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयामुळे पोलीस दलाचा अविभाज्य घटक असलेल्या श्वान पथकांतील या मुक्या शूर शिलेदारांच्या उर्वरित आयुष्याची योग्य आणि सन्मानाजनक काळजी घेतली जाईल, असे नमूद करून प्राणीप्रेमी आणि श्वान प्रेमींनी या संवेदनशील निर्णयाचे स्वागत केले आहे.

# शिंदी ते शेगाव पायदळ दिंडीला २४ ऑगस्टपासून प्रारंभ

दैनिक आपला विदर्भ

**सिंदखेडराजा । प्रतिनिधी :** सिंदखेड राजा तालुक्यातील शिंदी येथील श्री क्षेत्र बानूबा व श्यामगिरिबाबा संस्थान शिंदीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शिंदी ते श्री क्षेत्र शेगाव पायदळ दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाची ही दिंडी सोमवार, दि. २४ ऑगस्ट ते गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या या पायदळ दिंडीत शिंदीसह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. टाळ-मृदंगाचा गजर, भजन, कीर्तन, हरिनामाचा जयघोष आणि गजानन महाराजांच्या नामस्मरणाने दिंडीचा मार्ग भक्तिमय होणार आहे. दिंडीचे चालक ह.भ.प. सुनील महाराज केवट (शिंदी) असून, दिंडीच्या नियोजनासाठी संस्थेच्या वतीने विविध समित्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दिंडीदरम्यान भाविकांना सकाळचा नाश्ता, चहा-पाणी, दुपारचे भोजन तसेच सायंकाळी मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य सेवेसह मार्गदर्शनाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. दिंडीच्या नियोजित मार्गानुसार पहिल्या दिवशी शिंदी येथून प्रस्थान करून दिनांक २४ ऑगस्ट रोजीचा मुक्काम बल्लाळदेवी संस्थान अमडापूर येथे राहणार असून दिनांक २५ ऑगस्ट रोजीचा मुक्काम श्री संत गजानन महाराज संस्थान गणेशपूर येथे



आहे तर दिनांक २६ ऑगस्ट रोजीचा मुक्काम ब्रम्हांडनायक लॉन खामगाव येथे असुन सेवाधारींचे जेवण्याचे संपूर्ण व्यवस्था दरवर्षीप्रमाणे याही वर्षे शिंदी येथील खामगाव येथे पोलीस दलात कार्यरत असलेले प्रवीण गायकवाड हे करत असतात.

दिनांक २७ ऑगस्ट रोजी सदर दिंडीचा समारोप श्री संत गजानन महाराज संस्थान शेगाव येथे होणार आहे तरी यादरम्यान सकाळी व सायंकाळी अन्नदाते अनुक्रमे मधुकर भुसारी मोहखेड विठोबा रावणकर उदयनगर विश्वनाथ काळुसे काळुसे फार्म गिरधारी लाल खामगाव बल्लाळ देवी संस्थान अमरापूर केशव भाऊ बंगाळे गणेशपूर येथे विष्णू किसन गायकवाड ब्रम्हांडनायक लोन खामगाव येथे व त्यानंतर भाविकांचा पायी प्रवास सुरू राहून दि. २७ ऑगस्ट रोजी श्री क्षेत्र शेगाव येथे श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेऊन दिंडीची सांगता होणार आहे. दिंडीच्या माध्यमातून भक्ती, शिस्त, सामाजिक एकोपा आणि वारकरी परंपरेचा संदेश देण्यात येत असून, भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. दिंडीच्या यशस्वी आयोजनासाठी स्थापत्य, आरोग्य, भोजन, पाणी व्यवस्था, मार्गदर्शन, भजनी मंडळ तसेच विविध सेवाभावी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. शिंदी गावातून निघणारी ही पायदळ दिंडी यंदाही श्रद्धा आणि भक्तीचा अनोखा संगम ठरणार आहे. ''गण गण गणात बोते''च्या जयघोषात शिंदी ते शेगावचा पायी प्रवास करणाऱ्या भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### अर्जुन बिजलानी कार अपघातातून बचावला, टीमनं केली पुष्टी...

**मुंबई । प्रतिनिधी :** टीव्ही अभिनेता अर्जुन बिजलानीचा नुकताच मुंबईत कार अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. 'मिले जब हम तुम' या मालिकेतील हा अभिनेता त्याच्या आगामी 'चुंबक' या प्रोजेक्टच्या प्रमोशनवरून परतत असताना ही घटना घडली. अर्जुनच्या टीमनं चाहत्यांना आश्र्वस्त केले आहे की, काळजी करण्यासारखे काहीही नाही आणि तो सुरक्षित आहे. एका निवेदनात त्याच्या टीमनं म्हटलं आहे की, 'अर्जुन या प्रोजेक्टच्या प्रमोशनचा भाग म्हणून एका शोमध्ये सहभागी होण्यासाठी बाहेर पडला होता. शूटिंगवरून परतत असताना त्याच्या कारचा अपघात झाला. सुदैवानं, अर्जुन सुरक्षित आहे आणि कारमधील इतर लोकही सुरक्षित आहेत. कोणालाही गंभीर दुखापत झालेली नाही आणि अभिनेता ठीक आहे.

### समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल तिघांचा 'समाजरत्न' पुरस्काराने गौरव

**लातूर । प्रतिनिधी :** लोकमाता आहिल्या प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा 'समाजरत्न पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. लातूर येथे आयोजित या पुरस्कार सोहळ्यात सामाजिक, वैद्यकीय व सार्वजनिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या तीन मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात आला.यामध्ये रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे अध्यक्ष , सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब खैरे, सह्याद्री हॉस्पिटल, लातूरचे संचालक डॉ. हनुमान किनिकर तसेच लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत 'समाजरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.या पुरस्काराचे वितरण होळकर घराण्याचे वंशज भूषणसिंहराजे होळकर (इंदूर), सांगोल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख आणि खासदार रामराव वडकुते यांच्या हस्ते करण्यात आले. रोटरीच्या माध्यमातून बाळासाहेब खैरे यांनी आरोग्य, शिक्षण, सामाजिक सेवा आणि गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबवत समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. त्याचप्रमाणे डॉ. हनुमानजी किनिकर यांनी वैद्यकीय क्षेत्रातून रुग्णसेवेला प्राधान्य देत उल्लेखनीय कार्य केले आहे.

# गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलता, पीडितांबाबत संवेदनशीलता प्रभावी पोलीस व्यवस्थेचे सूत्र असावे : महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** महिलांची सुरक्षा हा केवळ कायदा व सुव्यवस्थेचा विषय नसून, सुशासनाचा महत्त्वाचा निकष आहे. पीडित महिलेचे म्हणणे कोणताही पूर्वग्रह न ठेवता शांतपणे ऐकावे आणि तिच्या सन्मानाची काळजी घ्यावी. गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबताना पीडितांबाबत कमाल संवेदनशीलता राखणे, हे प्रभावी पोलीस व्यवस्थेचे सूत्र असले पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र पोलिसांच्या वतीने आयोजित 'शक्ती व सुरक्षा' कार्यक्रमांतर्गत सायबर गुन्ह्यांविरोधात पोलिसांची क्षमतावृद्धी कार्यशाळेत त्या बोलत होत्या. याप्रसंगी राष्ट्रीय महिला आयोगाचे सदस्य सचिव सुदीप जैन, मुंबई उच्च न्यायालयाच्या




माजी न्यायमूर्ती साधना जाधव, राज्याच्या महिला गुन्हे प्रतिबंधक विभागाच्या विशेष पोलीस महानिरीक्षक शारदा राऊत, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, राज्य महिला आयोगाच्या सदस्या सचिव नंदिनी आवाडे, पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर, राष्ट्रीय महिला आयोगाचे संचालक राम अवतार सिंह व समन्वयक सर्वेश पांडे आदी उपस्थित होते.

श्रीमती रहाटकर म्हणाल्या की, केवळ तक्रार स्वीकारून किंवा एफआयआर नोंदवून पोलिसांचे कर्तव्य संपत नाही. पीडित महिलेला वन स्टॉप सेंटर, संरक्षण अधिकारी व मोफत कायदेशीर मदतीची माहिती देऊन संबंधित यंत्रणांशी जोडून द्यावे. पोलीस, संरक्षण अधिकारी, महिला व बालविकास विभाग आणि इतर यंत्रणांमध्ये समन्वय वाढवावा.

त्या म्हणाल्या की, तक्रारदार महिलेबाबत कोणताही पूर्वग्रह ठेवू नये. तिला पुरेसा वेळ देऊन तिचे म्हणणे मध्येच न तोडता ऐकून घ्यावे. आघातामुळे घटनेचा क्रम सांगताना पीडितेला अडचण येऊ शकते. त्यामुळे घाईघाईने निष्कर्ष काढू नयेत. सन्मानपूर्वक वागणुकीतून तिचा पोलिसांवरील विश्वास वाढतो.

बदलत्या काळानुसार गुन्ह्यांचे स्वरूपही बदलत आहे. सायबर गुन्हे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून होणारी फसवणूक, बनावट चित्रफिती आणि डिजिटल आर्थिक फसवणुकीसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी पोलिसांनी तंत्रज्ञान, माहिती आणि वैज्ञानिक पद्धतींचा प्रभावी वापर करावा. महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांची माहिती देणेही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्येक तक्रार गांभीर्याने घेऊन तपास निष्पक्षपणे व वेळेत पूर्ण करावा. 'सुरक्षित महिला म्हणजे सक्षम समाज आणि सक्षम समाज म्हणजे सक्षम राष्ट्र,' हे सूत्र लक्षात घेऊन सर्व यंत्रणांनी एकत्रित काम करावे. महाराष्ट्र पोलीस महिलांना न्याय देण्यासाठी प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यशाळेस छत्रपती संभाजीनगर (शहर आणि ग्रामीण), जालना, धाराशिव, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर आणि रेल्वे पोलीस दलातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. तसेच सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा आणि महिला मदत कक्षातील (भरोसा सेल) १५० पोलीस अधिकारी आणि २०० पोलीस अंमलदार या प्रशिक्षणात सहभागी झाले होते.